020 4559121

महाराष्ट्र शासन

क्रमांक :एनजीसी 1097/ रिट पिट/(186/97) मशि-3
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - 400 032.
दिनांक : 28 डिसेंबर , 1999.

प्रति,

कुलसचिव ,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

विषय : भारती विद्यापीठ, पुणे
सांगली येथे नवीन विधी महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत

संदर्भ : शासनाचे समक्रमांकाचे दिनांक 21 डिसेंबर 1999 चे पत्र .

महोदय,

समक्रमांक दिनांक 21 डिसेंबर 1999 च्या शासन पत्रान्वये भारती विद्यापीठ ,पुणे या संस्थेस सांगली येथे सन 1999-2000 या शैक्षणिक वर्षापासून नवीन विधी महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे . या आदेशामध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. ए. व्ही. सावंत व न्यायमूर्ती एस. राधाकृष्णन् यांच्या खंडपीठाने रिट याचिका क्रमांक 2687/ 97 मध्ये दिनांक 30.7.98 रोजी दिलेल्या निर्णयातील परि. 41(4) व 41(5) मधील निदेश विचारांत घेऊन खालीलप्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहे .

भारती विद्यापीठ, पुणे या संस्थेस सांगली येथे 1997-98 या शैक्षणिक वर्षापासून 3 वर्षाच्या विधी अभ्यासक्रमाचे महाविद्यालय विना अनुदान तत्वावर ( 3 वर्षानंतर टप्याटप्याने अनुदान तत्वावर ) सुरु करण्यास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, 1994 मधील कलम 82 (5) नुसार शासनाची परवानगी देण्यात येत आहे .

विद्यापीठाने सदर महाविद्यालयाच्या संलग्नीकरणाबाबत कार्यवाही करुन कार्यवाहीचा अहवाल शासनास पाठवावा.

आपला

( म. अ. सरपोतदार)
उपसचिव , महाराष्ट्र शासन

..2/-